MHAH080012142019

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक ६६४/२०१९**

**निशाणी क्र. ४० वरील आदेश**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे की, वादीने सदरचा दावा मोजणी होवुन मिळण्याकामी तसेच, अतिक्रमणीत क्षेत्राचा ताबा मिळणेकामी व निरंतर मनाई हुकूम होवुन मिळण्यासाठी केला आहे. प्रस्तुत दावा चालू असतांना प्रतिवादी क्र. २ यांनी मिळकत गट क्र. १२३/३ पैकी उत्तरेकडील पुर्व-पश्चिम बाजुचे क्षेत्र ०.३० आर खराबा ०.२१ आर ही मिळकत त्रयस्थ इसम अनशाबापु भाउसाहेब खरात यांना बेकायदेशिर, पोकळीस्त खरेदीखतान्वये दिलेली आहे. तसेच, प्रतिवादी क्र. २ यांनी गट क्र. १२३/३ पैकी दक्षिणेकडील पुर्व-पश्चिम बाजूचे क्षेत्र ०.२० आर खराबा ०.१० आर क्षेत्र त्रयस्थ इसम ज्ञानदेव पिलाजी हाळनर यांना बेकायदेशिर पोकळीस्त खरेदीखतान्वये दिलेले आहे. तरी, त्रयसस्थ इसम  अनशाबापु भाउसाहेब खरात व ज्ञानदेव हाळनर यांना सदर दाव्यात सामील करण्याकामी व त्या दृष्टीने दुरूस्ती करणेकामी सदरचा अर्ज केला आहे. तरी सदर दाव्यामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात यावी :-

**अ.** दाव्याच्या सरनाम्यामध्ये प्रतिवादी क्र. ८ नंतर ९ व १० असे अंक टाकून

प्रतिवादी क्र. ९ अनशाबापु भाउसाहेब खरात वय ३७ वर्षे

धंदा शेती राहणार डिग्रस ता. संगमनेर जि. अ.नगर

प्रतिवादी क्र. १० ज्ञानदेव पिलाजी हाळनर वय ४४ वर्षे

धंदा शेती राहणार डिग्रस ता. संगमनेर जि. अ.नगर.

**ब.** दावा कलम ०२ मध्ये प्रत्येक ठिकाणी प्रतिवादी क्र. १ ते ८ ऐवजी प्रतिवादी क्र. १ ते १० तसेच, दावा कलम ३ मध्ये दाव्यास कारणमध्ये ओळ नंबर ०१ वर प्रतिवादी क्र. १ ते ८ ऐवजी प्रतिवादी क्र. १ ते १० अशी दुरूस्ती करण्यात यावी. तसेच, दावा कलम १० ब व १०-क मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ८ ऐवजी प्रतिवादी क्र. १

ते १० अशी दुरूस्ती करण्यात यावी. सदरील दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असून, त्यामुळे, दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. सबब अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. वादीचे सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवून सक्त हरकत नोंदविली आहे. अर्जातील कारण खरे नसून संयुक्तीक नाही केवळ प्रतिवादींना त्रास देण्याच्या उददेशाने सदरचा अर्ज केला आहे. तसेच, प्रतिवादी क्र. ४, ६ ते ८ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दिले आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वैक्लपीकरित्या अर्ज मंजुर करावा असे मत झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्याचा हुकूम व्हावा.

४. दोन्ही बाजुंचे युक्तीवादावरुन व दाखल कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, वादीने मागणी केलेली दुरूस्ती ही तांत्रिक स्वरूपाची असून त्यामुळे दाव्याच्या स्वरूपामध्ये अथवा विनंती कलमामध्ये कोणताही फरक पडणार नाही. सदर दुरूस्तीस परवानगी दिल्याने प्रतिवादींच्या बचावावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. दोन्ही पक्षकारातील वादाचे समुळउच्चाटण करण्यासाठी काही खर्च लादुन सदर दुरूस्तीस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल असे मला वाटते. सबब अर्ज मंजुर होणेस पात्र आहे, त्याबाबतचा सविस्तर आदेश मी खालील प्रमाणे पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज वादीवर ५००/- खर्च लादुन मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने खर्चाची रक्कम सरकार जमा करावी.

३. वादीने अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरूस्ती ही सदर आदेश पारित झाल्यापासून १४ दिवसाचे आत करायची आहे.

M.J. Gaikwad
Digitally signed by M.J. Gaikwad
Date: 2024.01.16 18:00:30 +0530

(एम.जे.गायकवाड)
५वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
( कोर्ट नं. ५) संगमनेर

दिनांक :- १६/०१/२०२४